महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे/अतितात्काळ कालमर्यादा**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/२०२४/ 1920
दिनांक : ०६/०५/२०२४
06 MAY 2024

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासुन २०२३-२४ पर्यंतची व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत..**

**संदर्भ** :- १. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतुदी.
२. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण/२२२४/प्र.क्र.०६/प्रनिप्रा/९४० दि.३०.०४.२०२४

"महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५" मधील कलम ९ (५) च्या तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम दिनांकापर्यंत करण्यात आलेल्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकारणाची मान्यता घेणे बंधनकारक आहे तसेच, सदर प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

"महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५" मधील कलम ९ (५) च्या तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतच्या शैक्षणिक वर्षामधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित काही विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये अद्याप त्रुटी आहेत, तसेच, काही महाविद्यालयांनी संबंधित संचालनालयामार्फत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांची प्रवेश तपासणी व तदनुषांगाने प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त केलेली नाही तरी सुध्द, संबंधित विद्यार्थ्यांचा नियमित अभ्यासक्रम सुरु असून संबंधित विद्यार्थी/महाविद्यालय शासनाच्या विविध योजनेअंतर्गत सर्व फायदे व लाभ उपभोगत असल्याची बाब नाकारता येत नाही. ही एक प्रकारे शासनाची फसवणूक असून गंभीर बाब आहे.

उपरोक्त शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये अद्याप त्रुटी आहेत व सदरील त्रुटीचे निराकरण संबंधित अभ्यासक्रमांशी निगडीत महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य होते, परंतु सदरील त्रुटीचे पूर्तता झालेली नसल्याने, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना तत्कालीन प्रवेश नियंत्रण समिती तथा प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त नाही.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतची खालीलप्रमाणे प्रवेशांबाबतची माहिती आवश्यक आहे.

- ज्या महाविद्यालयांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे संचालनालयामार्फत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यता प्रस्तावांची प्रवेश तपासणी व तदनुषंगाने प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त केलेली नाही. अशा विद्यार्थीची अभ्यासक्रम व शैक्षणिक वर्षनिहाय अहवाल या कार्यालयास **दि.१०.०५.२०२४** पर्यंत खालील प्रपत्रानुसार Soft Copy (Excel-Email- info.dteropune@gmail.com) व PDF स्वरुपात या कार्यालयास सादर करण्यात यावे.

| संस्था क्र व संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थ्यांचे नाव | त्रुटीचे स्वरुप | त्रुटी पुर्तता न करण्याची कारणे | सदर विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता मिळाली नसल्याचा प्र.नि.प्रा.च्या ओदशाचा दिनांक | सदर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची सद्यास्थिती (विद्यार्थी सध्या कोणत्या वर्गात शिकतोय/ अभ्यासक्रम पुर्ण केला किवा कसे याची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :-१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यसन क्र. २अ) यांना माहितीस्तव

२. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता